# राशिभविष्य - नोव्हेंबर, २०११.

**दादा दामले** (dadadamle@hotmail.com )

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ शारीरिक-मानसिक आरोग्यदृष्ट्या प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल.ताप येणे,अपचन होणे, पोटविकार किंवा मूत्राशयविकार बळावणे अशापैकी आजार होणे संभवते. त्यात जीवनसाथीच्या व संततीच्या आरोग्य- विषयक संमस्यांची भर पडण्याची शक्यताही जाणवते. अशा परिस्थितीत मन शांत ठेवून व वाद, मतभेद टाळून काळ व्यतीत केलात तर बरेचसे प्रतिकुल असे घडणारच नाही. नोकरीत वरिष्ठांशी मतभेद होणे संभवते. जपा. गुरु-मंगळ शुभ योगामुळे यांत्रिक-तांत्रिक शिक्षण, नोकरी व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय असणारांना प्रगतिकारक व लाभदायक होईल; या काळात या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे, दगदग करू नये. महिन्याचा पूर्वार्ध लोखंड, पोलाद, दगडी कोळसा, खाणव्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. उत्तरार्धात मात्र मन व बुद्धी वाममार्गाकडे झुकण्याशी शक्यता दिसते. त्याला आवर घाला. बुध-शुक्राची अनुकुलता असल्याने व उत्तरार्धात गुरु-शुक्र शुभ योग घडत असल्याने अनेक मनोनुकुल घटना घडतील व त्यामुळे मनावरील दडपण विरून जाईल. पण सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करून होणारे नुकसान टाळू शकलात तरच सात्विक सुखसमाधान लाभेल. केतु व हर्षल-नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, घोटाळे, येणे वसूल होण्यास विलंब होणे संभवते. या राशीच्या लेखकवर्गाला, संशोधन कार्यात रत असणारांना, अन्य बौद्धिक व्यवसाय असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. नोकरीत वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी मनावर ताबा ठेवा. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल असून जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. नंतरच्या काळात अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते.. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज,वितुष्ट,भांडणतंटे,असमाधानकारक घटना अशापैकी कारणांमुळे सुख-शांति-समाधान मिळणे अशक्य होईल. म्हणून शक्यतो सहनशील व्हा व मौन व्रत धारण करा. त्यामुळे विपरीत ते फ़ारसे घडणारच नाही.गुरुमुळे अध्यात्मात रस असणारांना असे आचरण करणे सहज शक्य होईल. विशेष करून महिन्याच्या उत्तरार्धात असह्य मनस्ताप देणाया घटना घडण्याची शक्यता आहे.महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे मनोनुकुल व लाभदायक घटना घडतीलसे दिसते. उच्च बौद्धिक क्षमता असून शास्त्रीय विषयात संशोधन कार्य करत असणाया संशोधकांना

महिन्याचा पूर्वार्ध अधिक अनुकुल व प्रगतिकारक होईल. स्त्री- व्यावसायिकांना व व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडून अधिक लाभ होईल. या राशीच्या मंडळींना शिवोपासना अनुकुल असल्यामुळे त्यांनी शिवोपासना श्रद्धेने करावी.उत्तरार्धात मन व बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्यावी व मोहाचे प्रसंग टाळण्याचा प्रयत्न करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या पूर्वार्धात आरोग्य व नोकरी-व्यवसाय या दृष्टीने रवि ग्रह प्रतिकुल असेल तर तोच महिन्याच्या उत्तरार्धात मात्र अनुकुल होईल व आरोग्य सुधारून मनोनुकुल घटना घडतील. पण त्याच वेळी उत्तरार्धात शनि ग्रह या राशीच्या पंचम स्थानी येत असल्यामुळे संततिसुखाचे दृष्टीने प्रतिकुल होईल. त्यामुळे नैराश्य व जडत्व येणे संभवते, पण महिन्याच्या पूर्वार्धात न मिळणारे गृहसौख्य मात्र काही प्रमाणात मिळू शकेल. बुध ग्रह बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल; तर शुक्र वैवाहिक जीवनातील सुखाचे दृष्टीने प्रतिकुल होईल. अध्यात्मात रस असणाऱ्या या राशीच्या मंडळींना उपासनेत प्रगती होत असल्याचा अनुभव येईल, सूचक स्वप्ने पडतील व या राशीच्या काही भाग्यवंतांना परदेशगमनाचे योगही संभवतात. रवि-बुध-हर्षल शुभ योगामुळे महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चिकित्सक व उच्च बौद्धिक संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना मनोनुकुल, प्रगतिकारक, यश देणाऱ्या व लाभदायक घटना घडत असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या गुरुमुळे धनलाभ होणे संभवते. तसेच वकिली, अकौण्टण्सी अशा क्षेत्रांत कार्यरत असणारांना व याच शाखेचे शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रगती व यश मिळू शकेल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या मंगळामुळे महत्त्वाकांक्षा वाढेल, धैर्य, हिंमत वाढेल, पण बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. जपा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात उष्णतेच्या विकारांचा त्रास होण्याची दाट शक्यता आहे. घसा, दाढा, मान दूखणे, डोळ्यात खुपया वाढणे, अशापैकी त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. तसेच आर्थिक तोंडमिळवणी करणेही कठीण होईलसे दिसते.
महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल, तर काहींना भावंडविषयक समस्येला तोण्ड द्यावे लागेल. पण महिन्याच्या संपूर्ण काळात गृहसौख्यात ‍िविविध कारणांनी बाधा येणे संभवते. तरीही शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. उत्तरार्धात मात्र कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभणे कठिण दिसते. या राशीच्या ज्या मंडळींचा शास्त्रीय संशोधन क्षेत्राशी संबंध आहे, त्यांना व शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना प्रगतीचे दृष्टीने व आर्थिक लाभाचे दृष्टीने काळ अनुकुल होईल. काहींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. या राशीच्या मंडळींना जलभय व विषभय आहे. जपा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात स्वाभाविक दोषांमुळे दगदग, श्रम, शरीरपीडा यांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागेल. तसेच कूटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात काहींना नवे कार्यक्षेत्र वा नोकरी मिळू शकेल. त्यामुळे परिस्थितीत सुधारणा होण्यास सुरुवात होईल. कारण दिनांक १५ पासून या राशीच्या मंडळींना शनि -देवाची असलेली साडेसाती समाप्त होत आहे व अनुकुल काळाचा प्रारंभ होत आहे. तरीही
भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करीलसे दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात व्यवसायाच्या दृष्टीने काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण उत्तरार्धात कौटुंबिक त्रास,भांडणे,अनारोग्य, कार्यदिरंगाई आदि कारणांमुळे मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण बुध-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे गृहसौख्यात फ़ारशी बाधा येणार नाही. उलट शेती व्यवसाय असणारांना काल लाभदायकच होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर अपेक्षेपेक्षा अधिक कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. सप्तम स्थानातील नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात थोडी बाधा येऊ शकेल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेत प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. सद्गुणांचा विकास होईल व उत्कर्ष होऊन काहींना कीर्ती प्राप्त होईल. अपघातभय आहे. जपा.

**(६) कन्या -** शनीच्या साडेसातीचा काळ आहे. त्यामुळे या महिन्यात जीवनाच्या सर्व आघाड्य़ांवर संयम व सहनशीलतेचे आचरण करूनच प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. त्यात अनारोग्य व फ़सवणूक यांची भर पडण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत थोडी सुधारणा होईल. काहींना भूमिलाभ संभवतो; तर काहींना धनलाभ वा मानसन्मान प्राप्त होईलसे दिसते. शेती व्यवसाय असणारांना महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात आर्थिक लाभ होईल व सात्विक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या काहींना उगीचच काल्पनिक आजारभावना त्रस्त करील; तर काहींना फ़सवणूक झाल्याचा अनुभव येईल. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारीत संशयामुळे बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. तसेच दांपत्यजीवनातही मतभेद, वाद होणे संभवते. जपा. व्ययस्थानी असलेल्या मंगळामुळे अनेक प्रकारांनी मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. पण जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही भाग्यवंतांना अचानक धनलाभ होण्याची शक्यताही आहे.

**(७) तुळा -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असला तरी आपली राशी शनि ग्रहाची उच्च राशी आहे. त्यामुळे इतर राशीच्या मंडळींना साडेसातीच्या काळात जो त्रास सहन करावा लागतो, तितका त्रास या राशीच्या मंडळींना सहन करावा लागत नाही, असा अनेकांचा अनुभव आहे. तरीही या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींना अनारोग्य, नैराश्य,

कोर्टकचेरी, फ़सवणूक, आर्थिक चिंता अशापैकी कसला तरी त्रास सहन करावा लागेलच असे वाटते. तशात रवि ग्रहही प्रतिकुल असल्यामुळे मनस्तापात भरच पडेल. पण बुध-शुक्र हे दोन शुभ ग्रह परिस्थिती हद्दीबाहेर जाऊ देणार नाहीत. कौटुंबिक सुखसमाधान देतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या काही मंडळींना धनलाभ, काहींना मानसन्मान तर काहींना भूमिलाभ प्राप्त होण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्रीग्रहकां=
कडूनच अधिक अर्थलाभ होईलसे दिसते. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत हळवे, व भावनाप्रधान झाले असण्याची शक्यता दिसते. त्यामुळे अध्यात्मात रुची असणारांना उपासनेत प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या हर्षलमुळे मन अतिशय चंचल होईल, काहींना मुदतीचा ताप तर काहींना अति विचारामुळे मेंदूतील विकृतीचा त्रास सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरुमुळे या राशीच्या काही मंडळींना प्रवासयोग येईल, तर काहींना विवाहयोग येईल. केतुमुळे काहींना त्वचारोग, काहींना रक्तविकार तर काहींना दाताच्या दुखण्याचा त्रास सहन करावा लागेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. मंगळामुळे मैत्रीत वितुष्ट निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींचा शनिच्या साडेसातीचा काळ या महिन्याच्या १५ तारखेपासून सुरू होत आहे. आपली राशी मंगळाच्या स्वामित्वाची असून मंगळ व शनि शत्रुग्रह आहेत. त्यामुळे साडेसातीच्या काळात आपणांस मन शांत ठेवून, बुद्धी स्थिर ठेवून अत्यंत सावधानतेने आचरण केले पाहिजे. तसेच श्रद्धेने हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण केले पाहिजे. त्यामुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्ध काही प्रमाणात अनुकुल होईल.वैद्यकीय व्यवसाय,यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, कलात्मक व्यवसाय व उच्च चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांनी महिन्याच्या पूर्वार्धातच जे काही साधावयाचे ते साधून घ्यावे. नंतर रविशनि हे दोन्ही दादा ग्रह प्रतिकुल होणार असल्यामुळे मन अस्वस्थ राहील, कोर्ट प्रकरणे असतील तर त्यामुळे असह्य त्रास होईल. या राशीच्या ज्या मंडळींना रक्तदाब, हृदयविकार, वातविकार आहे त्यांनी तर मन व बुद्धी शांत व स्थिर राहील याची काळजी घेतलीच पाहिजे. अशा परिस्थितीत शुक्र गह अनुकुल असल्याने काही मनोनुकुल घटना घडतील व जीवन सुसह्य होईल. नेपच्यूनमुळे घरगुती बाबतीत गैरसमज होतीलसे दिसते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. दिनांक २० नंतर गुरु-शुक्रामध्ये शुभ व लाभदायक योग घडत असल्याने महिन्याच्या अखेरचे दहा दिवस सुखासमाधानाचे जातील.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींनी दिनांक २०-२१ आणि दिनांक २६-२७ हे चार दिवस विशेष जागरूक राहूनच सर्व व्यवहार करावेत. कारण त्या काळात शनिचे चंद्राशी होणारे

कुयोग असह्य मनस्ताप देण्याची शक्यता आहे. तुलनात्मक दृष्ट्या या राशीच्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल.या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस, वकिली, सल्लागारी व्यवसायास, शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. मात्र हर्षलमुळे काहीही घडले तरी मानसिक सुखसमाधान मिळण्याची शक्यता दिसत नाही. त्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान व अपेक्षित गृहसौख्य मिळेलच याची शाश्वती नाही. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत भावनाशील होणे संभवते. तरीही अध्यात्म, गूढविद्या अशा अगम्य विषयांची गोडी असणारांना काळ अनुकुल व मन:शांती देणारा असाच सिद्ध होईल. या राशीच्या काहींना जलप्रवासाची किंवा परदेशवारीची संधी मिळेलसे दिसते.

**(१०) मकर -** या राशीच्या उच्च बौद्धिक व संशोधन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मंडळींना प्रगती व यश या दृष्टीने या महिन्याचा काळ अनुकुल होईल. मात्र कोणत्याही प्रकारे आर्थिक जबाबदाऱ्या स्वीकारू नका. आर्थिक घोटाळे होण्याची शक्यता दिसते. मंगळ व केतूमुळे उष्णतेच्या विकारांचा त्रास होईल. पोटाचे विकार, मूळव्याध अशापैकी कसला तरी असह्य त्रास सहन करावा लागेल. शिवाय शारीरिक- मानसिक कष्ट, अपघातात हाडमोड, वीज-पाणी धोका वगैरे धोके आहेतच. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण नातेसंबंधातील मंडळींकडून त्रास होईलसे दिसते. घर खरेदी वा विक्री करावयाची असेल तर काळ अनुकुल होईल. बुध-शुक्र-गुरु या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. शासकीय, निम-शासकीय नोकरीत असलेल्या या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात शनि या राशीच्या द्शम स्थानी आल्यावर मात्र व्यापार-व्यवसायात क्रांतिकारक घटना घडण्याची शक्यता आहे. नोकरीत वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी कटाक्षाने असा मोह टाळा..राहूमुळे संततिविषयक समस्या निर्माण होणे संभवते..

**(११) कुंभ-** या राशीच्या मंडळींचे मन सध्या अत्यंत कोमल व भावनाशील असे घडले असावे असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे. अशा परिस्थितीत नकळत अविचाराने खर्च होण्याची शक्यता असते. .धनस्थानी असलेल्या हर्षलमुळे स्वभाव चंचल, अस्थिर होतो. जिभेवर नियंत्रण राहात नाही. जपा. या राशीच्या ज्या मंडळींना साहित्यिक लेखनाची कला अवगत आहे अशांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्यास काळ अनुकुल आहे. प्रवास, यात्रा होतील. पण भावंडांकडून त्रास होण्याची शक्यता आहे. घरातील माणसांशीही मतभेद संभवतात. जपा. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे दांपत्यजीवनात सुखसमाधान

मिळणे अशक्य होईल. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनिमुळे सतत अपेक्षाभंग होऊन मन अशांत राहील व त्यामुळे शारीरिक अनारोग्यही होण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या नोकरदार मंडळींना अतिशय अनुकुल होणार असून त्यांना विविश प्रकारचे लाभ होतीलसे दिसते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रह या राशीच्या लाभस्थानी जाईल व त्यामुळे महिन्याचा अखेरचा काळ या राशीच्या मंडळींना अपेक्षित सुखसमाधान लाभेल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अत्यंत चंचल, अस्थिर व लहरी झाला असण्याची शक्यता दिसते. कोणी केलेला उपदेश, धाक, दडपण सहन होत नसावे, असे वाटते. याला कारण या राशीच्या प्रथम स्थानी असलेला हर्षल होय. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यास मात्र अनुकुल होईल. हीच जन्मराशी असलेली लहान मुलेही सध्या अतिशय हूड व त्रात्य झाली असावीत असे वाटते. असो. या राशीच्या धनस्थानी मित्रराशीचा गुरु असल्यामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. नोकरी-व्यवसायात उत्तम अर्थप्राप्ती होईल. या राशीच्या व्यापारीमंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होणे संभवते. त्यामुळे थोडे फ़ार कर्ज असेल तर तेही फ़ेडून कर्जमुक्तीचे समाधान मिळवू शकाल. या राशीच्या षष्ठ स्थानी अग्निराशीत मंगळ असल्यामुळे या राशीच्या मंडळींना उष्णताविकारांचा त्रास होण्याची शक्यता दिसते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी अति विचार न करता मन व बुद्धी शांत राखण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. जीवनसाथीच्या अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. महिन्याच्या पूर्वार्धात अष्टम स्थानी असलेल्या शनिमुळे मानसिक अशांती निर्माण होईल किंवा एखादा मोठा आजार होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. काहींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. राहू, रवि, बुध यांच्या अनुकुलतेने महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीव्यवसायात मनोनुकुल घटना घडतील. दिनांक २१ पासून शुक्रही अनुकुल होत असल्याने सुखसमाधानात भरच पडेल.

**----ooooo-----**